# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक १६/११/२०१९

| पो. स्टेशन/अप. क्र./ कलम | घटनास्थळ/घटना ता. वेळ | फिर्यादि व आरोपीचे नाव |
|---|---|---|
| चामोर्शी | मौजा - फोकुर्डी पोस्टे चामोर्शी पासुन ०८ किमी दक्षिण | सरकारतर्फे- पोउपनि . भागवत कदम<br>नेम. स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली<br>आरोपीचे नाव:- सोमेश्वर बालाजी गोहने वय ४५ वर्षे रा. फोकुर्डी ता. चामोर्शी जि. गडचिरोली. |
| माहीती कशी प्राप्त झाली | अवैध दारु रेडमधील अधिकारी/ कर्मचारी | |
| गोपनीय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहीती वरुन | पोलीस उप निरीक्षक भागवत कदम, सोबतभाऊराव बोरकर, नुतेश धुर्वे, सिद्देश्वर बाबर स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली. | |
| | महाराष्ट्र शासनाने गडचिरोली जिल्हा दारुबंदि घोषीत केला असल्याने अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा या करीता मा.श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व ईतर अवैध व्यवसायावर रेड करुन प्रभावीपणे कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविलेली आहे.<br>स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस पथक हे दिनांक १५/११/२०१९ रोजी पोलीस स्टेशन गडचिरोली शहरात अवैध दारु रेड गस्तीवर असतांना गोपनिय सुत्रांकडुन माहीती मिळाली की सिमावर्ती चद्रपुर जिल्हयातील तसेच मौजा चामोर्शी येथील काही ठोक दारु पुरवठादार हे चारचाकी वाहनाने दारुची बेकायदेशिर वाहतुक करुन दारु विक्री संबधात मौजा फोकुर्डीयेथील अवैध दारु विक्रेता सोमेश्वर गोहने यांचे सोबत संगणमत करुन दारुचा साठा हा सोमेश्वर गोहणे याचे मालकिचे घरी साठवणुक करुन त्याचे माध्यमाने चामोर्शी तालुक्यातील चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच पुरवठा करण्याकरीता ठेवुन असल्याची माहिती मिळाली सदरची माहिती मा. श्री. डॉ. मोहित कुमार गर्ग, अपर पोलीस अधिक्षक (प्रशासन) तसेच पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी यांना देवुन त्यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेमधील नमुद पोलीस पथक अवैध दारु रेड करीता रवाना होवुन अवैध दारु रेड संबधाने नियोजन करुन योग्य प्रकारे सापळा रचुन मौजा फोकुर्डी ते नवेगाव रोड दरम्याण सोमेश्वर गोहणे यांचे मालकिचे बांधकाम सुरु असलेल्या नविन इमारतीचे समोरील भागात सापळा रचुन पाळत ठेवुन असतांना दिनांक १६.११.२०१९ चे रात्रो ०३.०० वाजता सुमारास सोमेश्वर गोहणे हा त्याचे ताब्यातील स्कुटर क्रमांक एमएच ३३ यु २०२० वर एका प्लॉस्टिकचे चुंगळीमध्ये एकुन २४,०००/- रुपये किमतीचे देशी दारुचे ३ बॉक्स मांडुन चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच पोहचता करुन देत असतांना मिळुन आला तसेच त्याचे मालकिचे फोकुर्डी ते नवेगाव रोड दरम्यान बांधकाम सुरु असलेल्या नविन इमारीत मध्ये पोहचुन अवैध दारु संबधात झडती घेतली | |

असता, एकुन ५,७६,०००/- रुपये किमतीचे एकुन ७२ सुपर सॉनीक रॉकेट संत्रा कंपनीचे बॉक्स प्रति बॉक्स १०० प्रमाणे प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या एकुन ७५००सिलबंद निपा मिळुन आल्याने दारुचा तसेच बेकायदेशिर दारु वाहतुकी करीता वापरती स्कुटर असा एकुन ६,६५,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेवुन सोमेश्वर बालाजी गोहणे रा. फोकुर्डी ता.चामोर्शी यांचे विरुध्द  पो.स्टे चामोर्शी येथे गुन्हा नोंद करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईमुळे अवैध दारु विक्रेत्यांचे धाबे दनानले आहेत.

